Times संवाद

>> डॉ. चंद्रशेखर बर्वे



चित्रे : अतुल बेलोकर

पृथ्वीचं पुनर्वसन



पृथ्वीच्या पोटातल्या प्रचंड उलथापालथीमुळे अन् पृथ्वीवरच्या लोकांच्या अनियंत्रित, बेलगाम वागण्यामुळे अंदाजे एक हजार वर्षांत पृथ्वी मानव वसाहतीस योग्य, सुखद राहणार नाही; मानवी समूहाला अंतराळात किंवा अवकाशात अन्य अनुकूल ग्रहावर वसतिस्थान बसवणं क्रमप्राप्त ठरेल, असा इशारा थोर विचारवंत स्टीफन हॉकिंग यांनी दिला आहे. त्याविषयी...

प्रस्तुत लेखाचं शीर्षक वाचून कोणाही सुजाण माणसाला नक्की धक्काच बसेल; 'पृथ्वीचं प्रेमगीत' ही कविवर्य कुसुमाग्रजांची सुंदर कविता आवडणाऱ्या रसिकांच्या पोटात तर गोळाच येईल. धरणग्रस्त गावांचं पुनर्वसन समजू शकतं, दुर्घटनाग्रस्त लोकांचं पुनर्वसनही स्वीकारता येतं; पण खुद्द अखिल पृथ्वीचंच पुनर्वसन? ही समजण्यास्वीकारण्याला अवघड अशी गोष्ट आहे खरी! परंतु कडू औषधासारखी गळ्यात उतरवणं अपरिहार्य असलेली अशीच ही गोष्ट आहे.

या गोष्टीला आधार आहे एका विश्वविख्यात वैज्ञानिक विचारवंतांचा - स्टीफन हॉकिंग याचा. त्यानं केलेल्या भाकिताचा, दिलेल्या इशाऱ्याचा. त्याच्या प्रतिपादनाचा सारांश असा की पृथ्वीच्या पोटातल्या प्रचंड उलथापालथीमुळे अन् पृथ्वीवरच्या लोकांच्या अनियंत्रित, बेलगाम वागण्यामुळे अंदाजे एक हजार वर्षांत पृथ्वी मानव वसाहतीस योग्य, सुखद राहणार नाही; मानवी समूहाला अंतराळात किंवा अवकाशात अन्य अनुकूल ग्रहावर वसतिस्थान बसवणं क्रमप्राप्त ठरेल. अलौकिक, असाधारण प्रतिभावंत/प्रज्ञावंत जर पुन: पुन्हा असा धोक्याचा लाल बावटा दाखवत असेल तर जागरूक, सावध शहाण्यांनी गंभीरपणे विचार करूनच पुढील मार्गक्रमणाची दिशा ठरवणं आवश्यकच होय.

हितकारक मार्गक्रमण सुरू झालं आहे, अधिकाधिक वेग घेत आहे, असं ठामपणानं म्हणता येईलही. सध्या जागतिक स्तरावर जे अवकाश संशोधन चालू आहे, अंतराळात. मानवरहित किंवा मानवासहित यानं पाठवून ज्या मोहिमा आखल्या जात आहेत, प्रयोग केले जात आहेत, अनुकूल निष्कर्ष काढले जात आहेत ते सारे लक्षात घेता, भवितव्य डोळ्यापुढे ठेवून नियोजनपूर्वक वाटचाल सुरू झाली आहे, असं निश्चितपणे म्हणता येईलच. कविकल्पना अथवा विज्ञान काल्पनिका (सायन्स फिक्शन) यांच्या पलीकडे आपण आता आलेलो असल्यामुळे सुखदायक भविष्याची स्वप्नं पाहण्यास नव्हे, भविष्याची रास्त अपेक्षा करण्यास, आशा बाळगण्यास कोणतीच आडकाठी असणार नाही.

शिवाय असं की आज अभियांत्रिकी, वास्तुरचना, नगरनियोजन (टाउनप्लॅनिंग) अशा सर्व बाबतींत झालेली नेत्रदीपक कामगिरी पाहता, कोणतीही अपेक्षा, आशा कपोलकल्पित, अनाठायी ठरेलच कशी? प्रश्न हजार वर्षानंतर अंतराळामध्ये जाऊन वसाहत स्थापण्याचा अथवा अवकाशात परग्रहावर राहून वसती करण्याचा नाहीच आहे मुळी; खरा प्रश्न वेगळाच आहे. तो आहे तेथे राहायला जाणाऱ्या मानवाशी संबंधित, त्याच्या तेथील वास्तव्यासाठी त्याच्या ठिकाणी आवश्यक असणाऱ्या गुणांविषयीचा आणि हाच प्रश्न जास्त महत्त्वाचा आहे.

आणखी एका थोर शास्त्रज्ञानं त्याला विचारल्या गेलेल्या प्रश्नाचं जे उत्तर दिलं होतं त्यामधूनच आताच्या प्रश्नाचंही उत्तर मिळू शकेल. शास्त्रज्ञाला विचारलं गेलं होतं की पहिलं जागतिक महायुद्ध अमक्या शस्त्रांनिशी लढलं गेलं, दुसरं तमक्या अस्त्रांनी लढलं गेलं, यानंतर होणाऱ्या तिसऱ्यात कोणत्या शस्त्रास्त्रांचा वापर केला जाईल? याचं उत्तर त्यानं असं दिलं होतं की नक्की सांगता येणार नाही; पण चौथ्याबद्दल खात्रीनं सांगता येईल की त्यात आदिमानवानं अश्मयुगात केला होता तसा दगड-धोंड्यांचा वापर केला जाईल. याचा अर्थ असा की आजचं प्रगत, संस्कृतिनिर्माणक जग पुन्हा एकदा पार मागील कालखंडात ढकललं जाईल. असं जर होणार असेल तर संहारामुळे रसातळाला गेलेला मानवी समुदाय, त्याची संस्कृतिमूल्य यांच्या चिंधड्याचिंधड्या, ठिकऱ्याठिकऱ्या झाल्यावर, संभाव्य पुनर्वसनाच्या वेळी त्याच्यामधे कोणते अन् किती गुण उरणार, हे अगदी उघड आहे.

या संदर्भात मराठी रंगभूमीवरच्या एका प्रख्यात नाट्य (लोकनाट्य) कलावंतांच्या खुमासदार आत्मचरित्रातला एक गमतीदार प्रसंग खूपच उद्बोधक ठरू शकेल. तो कलावंत जुन्या जागेतून नव्या नगर वस्तीमधल्या जागेत राहायला जातो तेव्हा आपल्या कुटुंबीयांना तो मिश्किलपणे सांगतो की आता इथं पूर्वीच्या गावरान शैलीत मुखमार्जन करू नका. यातून ध्यानात येतं ते हे की केवळ वस्ती/जागा बदलली म्हणजे लगेच आगोदरचे संस्कार पुसले जात नाहीत, आधीच्या सवयी सुटत नाहीत. तात्पर्य असं की भावी पुनर्वसनात पूर्वसंचित गुणावगुण अडथळा ठरू शकण्याचा अन् कदाचित ते पुनर्वसन निरर्थक ठरण्याचा संभव जमेला धरणं आवश्यक आहे. तो टाळण्यासाठी आगोदरच पुरता विचार करून कृती करायला हवी.

नव्या जगतात आमूलाग्र, अंतर्बाह्य, पूर्णपणे नवं, आधुनिक, मॉडर्न होऊन जाणं सोपं, सहजसाध्य नाहीच. आपला इतिहास बघितला तर अस दिसतं की संत येऊन गेले, नवविचारवंत होऊन गेले, विज्ञाननिष्ठ सुधारक तर आजही आहेत; पण आपली पूर्वापार बसलेली घडी जवळ जवळ आहे तशीच आहे. रोकडी वस्तुस्थिती ही आहे की बाहेरून काही परिवर्तन झालं तरी आतून मनोधारणा क्षणात सहजासहजी विकसित होत नाही. हे तसं स्वाभाविक/नैसर्गिक आहे. बुद्धीपेक्षा उपजत प्रेरणा - प्रवृत्ती प्रभाव ठरते, प्रेरणा प्रवृत्तीत बदल होणं हे जनुकांच्या रचना बदलावर अवलंबून असतं आणि हे घडण्यासाठी शताधिक/सहस्राधिक वर्षही लागू शकतात. कसा अवघड तिढा आहे पहा. वेश नवा; पण अभिनिवेश जुना! मग पुनर्वसनाचं काय व्हायचं?

वैज्ञानिक-कल्पित पुनर्वसनाची वेळ यायला आणखी बराच अवधी आहे. आजच्या सर्वाधिक लोकप्रिय खेळाच्या - क्रिकेटच्या - भाषेत बोलायचं तर कसोटी सामान्याचा पाचवा दिवस उगवायला अजून पुष्कळ अवकाश आहे, तोपर्यंत बरंच काही करणं शक्य आहे. अर्थशून्य गोष्टींचा त्याग करून अर्थपूर्ण उपकारक गोष्टचा स्वीकार/अंगीकार करता येईल. या कामी आता धर्माचा उपयोग नाही. बुद्धीनिष्ठ नीतीचा अवलंब कठीण आहे; परंतु लोकसत्तेच्या मर्यादेत राहून, दंडसत्तेचा प्रयोग टाळूनही, कायद्याच्या काटेकोर अंमलबजावणीच्या साह्यानं बरंच मोलाचं काही साध्य करता येईल. नवीन वास्तूत प्रवेश करण्यापूर्वी भंगार टाकून द्यावं लागतं, उपयुक्त - सुटसुटीत (ओझं न वाढवणारं) सामानच बरोबर घ्यावं लागतं, तरच तेथील प्रवेश - रहिवास सुखावह ठरू शकतो. हा बोध घेतला तर कदाचित पुनर्वसनाची वेळ येईपर्यंतचा काळ आनंदात जाऊ शकेल. काही झालं तरी 'धड ना अस्त, धड ना पस्त' असं होऊ नये - त्रिशंकूप्रमाणे दयनीय, केविलवाणी अवस्था होऊ नये.

असा अनवस्थ विचित्र प्रसंग ओढवू नये, म्हणून विश्वकल्याणाच्या दृष्टीनं, मराठीतल्या एका थोर निबंधकारांनी मागे एक विलक्षण विचार मांडला होता. जगातली सारी राष्ट्रं खऱ्या अर्थानं कायमची एक व्हायला व राहायला हवी असतील तर परग्रहावरून आपल्या ग्रहावर जोरदार आक्रमण झालं पाहिजे. आता असं आक्रमण न होताच, पृथ्वीचं मूळ अस्तित्वच धोक्यात येणार असेल तर या महासंकटाचा महामुकाबला करण्यासाठी तरी सर्व राष्ट्रांनी संघटित होण्याची नितांत गरज आहे. या पुढे विश्वकुटुंबाची खोटी, फसवी भाषा मुळीच कामी येणार नाही, हे पटवून घेऊन, अभेद्य संघटित शक्तीची वाढ भूमिती श्रेणीनं (म्हणजे २, ४, ८, १६ अशा वाढत्या पटीत) करण्याचीच आवश्यकता आहे.

निसर्गदत्त प्रज्ञेचा वापर करून विवेकाचा अंकुश टोचून, हितकर मार्ग जर ओळखता आला नाही तर मात्र पुढच्या घडामोडींची कल्पना करणंही मानवप्राण्याच्या हातात राहणार नाही. पावसाळी ओहोळातून जाणाऱ्या होडीसारखी प्रवाहपतिताची गत त्याची होईल. निर्जीव होडीचं जिणं जिवंत मानवाच्या वाट्याला येऊ नये. ते आलं तर काय होईल? नवा संगमरवरी, आरस्पानी, ऐश्वर्यसंपन्न राजमहाल तिकडे अंतराळात/ अवकाशात तयार असेल, पण तिथं राहण्याजोग्या अवस्थेत मानव नाही. असं जर झालं तर तो दारूण दैवदुर्विलास ठरेल. किंवा पारंपरिक भाषेत तो कलियुगाचा महाभयंकर चरचरीत सारांश म्हणावा लागेल!

पृथ्वीचं प्राक्तन शापितच असलं तर पुनर्वसनाऐवजी महाभीषण निर्वासनाखेरीज दुसरं गत्यंतर तरी कोणतं असणार?